महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २०

# महाराजा सयाजीरावांचे जातविषयक चिंतन

## सुरक्षा घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २०

# महाराजा सयाजीरावांचे जातविषयक चिंतन

सुरक्षा घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीरावांचे
जातविषयक चिंतन
इतिहास
सुरक्षा घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ४०
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सुरक्षा घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे, ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर - ४१६११४
७५०७३९९०७२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४७ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/**
**101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/**
**1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीरावांचे जातविषयक चिंतन

दक्षिण आशियाच्या इतिहास व संस्कृतीचे अभ्यासक आणि अमेरिकन समाजशास्त्रज्ञ निकोलस डिर्क्स भारताचे वैशिष्ट्य सांगताना म्हणतात, “भारत म्हणजे जात.” त्यांचे हे विधान भारताचा इतिहास, समाज, संस्कृती अभ्यासू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे. भारताच्या संदर्भात आपण जेव्हा लोकशाहीचा विचार करतो तेव्हा भारतीय समाजाच्या लोकशाहीकरणातील सर्वात मोठा अडथळा जातिव्यवस्था ठरते. भारताने लोकशाही स्वीकारल्यानंतर ७१ वर्षांनीसुद्धा भारत लोकशाही साक्षरतेत बराच मागे असल्याचे वास्तव आपल्या दैनंदिन जीवनातील अनुभवाच्या आधारे समोर येते.

आज आपण व्यवहारात अस्पृश्यता सोडून दिली असली तरी आजही भारतीय माणूस जातकेंद्रीच विचार करताना दिसतो. उदाहरण द्यायचे झाले तर एकाच सीटवर बसून प्रवास करणारे दोन भारतीय परस्परांशी जेव्हा ओळख करून घेतात तेव्हा आपल्या

शेजारी बसलेली व्यक्ती कोणत्या जातीची असेल हे जाणून घेण्याची निरागस जिज्ञासा आपण अनुभवत असतो. निरागस यासाठी की आपण जातीयवादी असल्यामुळे जात जाणण्याची जिज्ञासा बाळगतो असे नाही तर भारतीय मानसशास्त्र आणि विचारप्रक्रिया जातीने बंदिस्त केलेली असते.

या उदाहरणावरून जात ही आपल्या शरीराच्या एखाद्या अवयवाप्रमाणे आपल्याशी एकरूप झालेली असते. त्यामुळेच अस्पृश्यता निर्मूलन आणि जातिप्रथा निर्मूलन हे भारतीय समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील सर्वात आव्हानात्मक वळण आहे. त्यामुळेच भारतात एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच महापुरुष या आव्हानाला भिडू शकले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात त्याप्रमाणे अस्पृश्यता आणि जातीयतेचा प्रश्न सोडवण्यामध्ये सयाजीराव महाराजांना जेवढे यश मिळाले तेवढे यश आजअखेर कोणालाही मिळाले नाही.

अस्पृश्यतेचे चटके बसलेल्या एखाद्या व्यक्तीने अस्पृश्योद्धाराचे काम करणे स्वाभाविक आहे. परंतु अशा कोणत्याही अनुभवाशिवाय आणि महत्त्वाचे म्हणजे भूतदयेच्या भावनेने नाही तर अस्पृश्यतेला राष्ट्रीय प्रश्न मानून कर्तव्य भावनेने अस्पृश्योद्धाराचे काम ६४ वर्षे करणारे सयाजीराव हे समाजक्रांतिकारक होते. कारण इतकी वर्षे एखाद्या व्यक्तीने सातत्याने जातीच्या प्रश्नाला भिडण्याचे भारतातील आजअखेरचे हे एकमेव उदाहरण आहे. सयाजीराव हे सरंजामी व्यवस्थेतील राजे

असूनही लोकशाही तत्त्वांना आपल्या वैयक्तिक जीवनापासून ते सामाजिक जीवनापर्यंत वयाच्या १४ व्या वर्षापासूनच अंगिकारताना दिसतात.

वरवर पाहता ही बाब आपल्याला फारशी क्रांतिकारक वाटणार नाही. परंतु वयाच्या १४ व्या वर्षापासून जातीच्या प्रश्नाला भिडणारा प्रशासक भारताच्या इतिहासात सापडत नाही. कारण महात्मा फुल्यांना जातीच्या प्रश्नाला भिडण्याची प्रेरणा परांजपे नावाच्या मित्राच्या वरातीतून त्यांना शूद्र म्हणून हिणवून हाकलण्यात आल्यानंतर मिळाली. यावेळी फुल्यांचे वय अंदाजे १९-२० असेल. समाजक्रांतिकारक राजर्षी शाहूंना जातीच्या प्रश्नाला हात घालण्यासाठी वेदोक्त घडावे लागले. इतकेच काय जातिव्यवस्थेने होरपळलेल्या बाबासाहेबांच्या मनात या प्रश्नाच्या सोडवणुकीची प्रेरणा निर्माण होण्यासाठी वयाची पंचविशी यावी लागली.

सयाजीरावांना मात्र जातीच्या प्रश्नात लक्ष घालण्यासाठी वैयक्तिक जीवनात जातीय दुय्यमत्वाचा कोणताही अनुभव घ्यावा लागला नाही. लहानपणी कवळाण्यासारख्या छोट्या खेड्यात सर्व जातीच्या गरीब आणि सामान्य मित्रांमध्ये सर्वसमावेशक सहजीवनाचा मिळालेला संस्कार आणि राजा झाल्यानंतर शिक्षणाची मिळालेली संधी सयाजीरावांच्या जीवनात निर्णायक ठरली. जगप्रवासातून मिळालेली तुलनात्मक दृष्टी आणि ज्ञानलालसेच्या असीम तळमळीतून जोपासलेला व्यासंग

सयाजीरावांच्या सर्वसमावेशकतेला परिपूर्णतेच्या सर्वोच्च ठिकाणी घेऊन गेला. जातीप्रश्नाला सर्वात क्रांतिकारकपणे भिडलेल्या महात्मा फुल्यांपेक्षाही सयाजीरावांची ही कृती उजवी ठरावी.

## अस्पृश्यांच्या भौतिक उद्धाराचा 'सयाजीमार्ग'

अस्पृश्यता नष्ट करण्याचा एक प्रभावी उपाय म्हणून स्पृश्य-अस्पृश्य सहभोजनाचा उपक्रम स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक सुधारकांनी राबविला हे आपण जाणतोच. परंतु वयाच्या १४ व्या वर्षी १८७७ मध्ये सयाजीरावांनी अहमदाबाद येथे अस्पृश्यांसह सहभोजन करून अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास सुरुवात केली होती. राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर दोनच वर्षांमध्ये १८८३ साली त्यांनी राजवाड्यातील खाजगी खंडेरायाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. हे त्यांच्या क्रांतिकार्याचे पहिले पाऊल होते. १८८६ मध्ये राजवाड्यातील अस्पृश्यांसाठी वेगळ्या जेवणाच्या पंगतीची पद्धत सयाजीरावांनी स्वत: त्या पंगतीत बसून मोडली.

२३ जानेवारी १९१० रोजी सयाजीरावांनी बडोद्यातील अस्पृश्य शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या राजवाड्यावर मेजवानी दिली होती. भारतातील अस्पृश्योद्धाराच्या चळवळीतील मंदिर प्रवेशाचे स्थान अनन्यसाधारण आहे. २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील पंजाबराव देशमुखांच्या नेतृत्वाखालील १९२७ चा अमरावती येथील अंबाबाई मंदिर प्रवेश, डॉ. आंबेडकरांच्या

नेतृत्वाखालील १९२९ च्या पर्वती टेकडी आणि १९३० च्या काळाराम मंदिर प्रवेशासाठीची आंदोलने महाराष्ट्रभर गाजली. परंतु १९२४ मध्ये त्रावणकोर संस्थानातील व्हायकोम येथे विठ्ठल रामजी शिंदेंच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंदिर प्रवेशाच्या आंदोलनाबाबत पुरोगामी महाराष्ट्र 'अज्ञानी' राहिला.

याउलट महाराजा सयाजीरावांनी १८८३ मध्येच आपले खाजगी खंडेरायाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले होते. १९२५ मध्ये सयाजीरावांनी अमरेली येथील सार्वजनिक मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. तर १९३२ मध्ये सयाजीरावांनी कोणत्याही आंदोलनाशिवाय बडोदा संस्थानातील सर्व सरकारी मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. मंदिर 'प्रवेशा'चा हा अज्ञात इतिहास आजच्या समाजाने समजून घेतला तर अस्पृश्यता निर्मूलन चळवळीविषयीचे आकलन अधिक परिपूर्ण होण्यास मदत होईल. कोणत्याही आंदोलनाशिवाय जनतेला मंदिर प्रवेशाचा हक्क बहाल करणाऱ्या सयाजीरावांनी सातत्याने आपल्या भाषणांमधून धर्म आणि जात यांच्या वस्तुनिष्ठ आकलनाची आवश्यकता स्पष्ट केली.

१९०७ मध्ये सयाजीरावांनी अस्पृश्यांसह सर्व लोकांकरता सार्वजनिक विहिरी बांधण्यासाठी साडेपाच लाख रुपयांची मदत केली. १९३७ मध्ये बडोदा संस्थानात अस्पृश्यांसाठी १३२४ विहिरी होत्या. सरकारी काम करत असताना स्पृश्य-अस्पृश्यतेचे नियम पाळू नयेत असा स्पष्ट आदेश सयाजीरावांनी सर्व

शासकीय कार्यालयांना दिला होता. बडोदा संस्थानातील सर्व दवाखाने, कोर्ट इतर सरकारी कचेऱ्या व ग्रंथालये या ठिकाणी सर्व अस्पृश्यांना मुक्त प्रवेश होता.

१९३० मध्ये स्थानिक सरकारी संस्थांमध्ये अस्पृश्यांचा समावेश सुरू केला. तसेच याच वर्षी प्रांत पंचायतीच्या नामनिर्देशित सदस्यांमध्ये अस्पृश्य वर्गातील एक सदस्य असणे बंधनकारक केले. १९३१ मध्ये सयाजीरावांनी हुकूम काढून हौद किंवा विहिरी बांधल्यावर किंवा त्याची योजना सादर करताना अस्पृश्यांना त्याचा वापर करू देणे बंधनकारक केले. सहभोजन, मंदिर प्रवेश आणि कायदे मंडळातील सहभाग याद्वारे अस्पृश्यांना भौतिक सन्मान प्रदान करणारे सयाजीराव भारतातील पहिले प्रशासक ठरावेत.

## बडोद्यातील अस्पृश्य शिक्षण

अस्पृश्यांना कायमस्वरूपी त्यांच्या हक्काबाबत जागृत ठेवायचे असेल तर त्यांना शिक्षण देण्याची गरज ओळखून सयाजीरावांनी आपल्या संस्थानात १८८२ साली अस्पृश्यांच्या शिक्षणास सुरुवात केली. १८८२ मध्ये महात्मा फुले हंटर कमिशनसमोर शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाची मागणी करत असताना त्याचवर्षी सयाजीरावांनी बडोदा जिल्ह्यातील सोनगड येथे अस्पृश्य व आदिवासींसाठी सरकारी खर्चाने शाळा आणि वसतिगृह सुरू केले. या शाळेत शिक्षणाबरोबरच शालेय साहित्यही

विद्यार्थ्यांना मोफत दिले जात होते. पुढे २६ वर्षांनंतर १९०८ मध्ये याच धर्तीवर शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य मुलांना 'मिस क्लार्क हॉस्टेल'च्या माध्यमातून वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली.

१८९२ मध्ये सयाजीरावांनी अमरेली प्रांतात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा यशस्वी केला. १८८२ मध्ये बडोदा संस्थानात अस्पृश्यांच्या २ शाळा कार्यरत होत्या. १८९६ मध्ये अस्पृश्यांसाठीच्या शाळा २० पर्यंत वाढल्या. १९०६ मध्ये सयाजीरावांनी संपूर्ण बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. १९०६-०७ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर बडोदा सरकारकडून प्रति महिना ११५ रु. खर्च केले जात होते. ५ वर्षानंतर २४ सप्टेंबर १९११ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य विद्यार्थ्यांना फी माफी करण्याचा निर्णय घेतला. शाहू महाराजांच्या अस्पृश्योद्धाराच्या या कार्याची प्रेरणा सयाजीराव गायकवाड हेच होते.

१९०६ मध्ये सयाजीरावांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा संपूर्ण संस्थानात लागू केल्यानंतर अस्पृश्यांसह ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाचे प्रमाण वेगाने वाढले होते. कायदा आणि अधिकाराच्या जोरावर बदल घडविण्याअगोदर समाजाची मानसिकता बदलण्याचा सयाजीरावांचा प्रयत्न होता. याच भूमिकेतून सयाजीरावांनी १९३९ पर्यंत अस्पृश्यांसाठीच्या शाळा आणि मिश्रशाळा या दोन्ही प्रकारच्या शाळा बडोद्यात

चालू ठेवल्या. १९०७-०८ मध्ये सयाजीरावांनी अस्पृश्य मुलांच्या शाळांसाठी स्वतंत्र उपनिरीक्षक म्हणून आर्य समाजाचे महत्त्वपूर्ण प्रसारक पंडित आत्माराम राधाकृष्णन यांची नेमणूक केली. दुर्दैवाने जातनिर्मूलनासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या पुरोगामी चळवळीला सयाजीरावांचे हे योगदान आजही माहीत नाही. अस्पृश्यांना केवळ साक्षर न करता त्यांना मिळालेल्या शिक्षणाचा योग्य वापर व्हावा या उद्देशाने सयाजीरावांनी अस्पृश्यांच्या वैचारिक प्रबोधनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

सयाजीरावांनी अस्पृश्य शिक्षणासाठी केलेले प्रयत्नांचे एफ. जे. गाऊल्ड व सी.एस. कुपर या दोन परदेशी व्यक्तींनी केलेले मूल्यमापन महाराजांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करते. बडोद्यातील अस्पृश्यांच्या शाळेला भेट दिल्यानंतर प्रभावित झालेले लंडन येथील 'द मॉरल एज्युकेशन' या संस्थेतील प्राध्यापक एफ. जे. गाऊल्ड लिहितात, "माझ्या बडोद्याच्या यात्रेदरम्यान एका दृश्याने मला अत्यानंद झाला. बडोदा शहरानजीक निराश्रित जातींसाठीच्या आश्रमामध्ये ५० विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांचे कपडे स्वच्छ असतात. त्यांना उत्तम प्रकारे शिक्षण दिले जाते. त्यांचे बुद्धिचातुर्य प्रशंसनीय आहे. आजवर अंधकारमय जीवन जगणाऱ्या या लोकांच्या मुक्तीचे बडोद्यातील हे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे."

अशीच प्रतिक्रिया न्यूयॉर्कच्या सी.एस. कुपर यांनीदेखील नोंदवले आहे. सी.एस.कुपर लिहितात, “मला या संस्थेमुळे (निराश्रित जातींसाठीचा आश्रम) खूप आनंद झाला. येथील विद्यार्थी मी आजवर पाहिलेल्या प्रतिभावान विद्यार्थ्यांपेक्षाही अधिक प्रतिभावान आहेत. ही बाब तेथील शिक्षकांचा सन्मान वाढवते. रहस्यमय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी काम करणारी ही भारतातील एक संस्था आहे.” या दोन परदेशी व्यक्तींच्या बडोद्यातील अस्पृश्योद्धाराच्या कार्यावरील प्रतिक्रिया महत्त्वाच्या आहेत. कारण त्या जातिव्यवस्थेच्या चौकटीबाहेरील व्यक्तींच्या आहेत.

## अस्पृश्यांच्या बौद्धिक उत्कर्षासाठीचे प्रयत्न

अस्पृश्यांना मिळालेल्या शिक्षणाच्या आधारे त्यांचा धार्मिक व सामाजिक स्थितीच्या आकलनाच्या कक्षा वाढाव्या यासाठी विविध व्याख्यानांचे आयोजन, ग्रंथ प्रकाशन व प्रसंगी कायदे तयार करण्यावर सयाजीरावांनी भर दिला. १८८४ मध्ये फुलेंच्या बडोदा भेटीत त्यांची समाजसुधारणेवरील तीन व्याख्याने सयाजीरावांनी आयोजित केली होती. या व्याख्यानांचे विषय अनुक्रमे ‘दलितोद्धार’, ‘स्त्रीस्वातंत्र्य’ आणि ‘हिंदुस्थानातील शेतकरी’ असे होते. विविध नामांकित व्यक्तींच्या माध्यमातून संस्थानातील जनतेला अद्ययावत ज्ञान सातत्याने देण्याचा प्रयत्न सयाजीरावांनी केला. १९०७ मध्ये विठ्ठल रामजी शिंदेंच्या बडोदा भेटीत सयाजीरावांनी त्यांचे ‘अस्पृश्योद्धार’ या विषयावर

बडोद्याच्या न्यायमंदिराच्या दिवाणखान्यात एक व्याख्यान करविले. नंतर हेच व्याख्यान 'बहिष्कृत भारत' या स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले.

सयाजीरावांनी या पुस्तकाच्या एक हजार प्रती विकत घेऊन बडोदा संस्थानात वाटल्या. हा विठ्ठल रामजी शिंदेंचा या विषयावरील पहिला मराठी निबंध होता. हा निबंध म्हणजे १९३३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या अस्पृश्यतेच्या प्रश्नाची समाजशास्त्रीय चर्चा करणाऱ्या मराठीतील पहिल्या ग्रंथाचा पाया होता. हा ग्रंथ शिंदेंनी सयाजीरावांना अर्पण केला आहे. १९०९ मध्ये धर्मानंदांनी बडोद्यात बौद्ध धर्मावर ५ भाषणे दिली. त्यातील ३ भाषणे 'बुद्ध, धर्म आणि संघ' या नावाने छोट्या पुस्तिकेच्या स्वरूपात आज उपलब्ध आहेत.

पंडित सातवळेकर यांच्या 'स्पर्शास्पर्श' या पुस्तकालाही सयाजीरावांनी आर्थिक मदत केली. १९२८ मध्येच बडोदा संस्थानकडून प्रकाशित करण्यात आलेला 'A Glossary of Castes, Tribes and Races In The Baroda State' हा ग्रंथदेखील सयाजीरावांच्या जात साक्षरतेच्या प्रयत्नांचाच भाग होता. महाराजांनी १९२८ मध्ये 'श्री सयाजी साहित्यमालेत' 'मुंबई इलाख्यातील जाती' हे पुस्तक "TRIBES & CASTES OF BOMBAY" या पुस्तकाचे मराठी भाषांतर गोविंद मंगेश कालेलकर यांच्याकडून करून घेऊन प्रकाशित केले. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती पुण्याच्या ह.अ. भावे यांनी वरदा प्रकाशनातर्फे प्रकाशित केली.

ब्राह्मणांवरील रागापोटी टोकाच्या द्वेषभावनेने जातीच्या प्रश्नाला भिडणारे भरपूर नेते आणि अभ्यासक भारतात आढळतात. परंतु या सगळ्यांहून सयाजीराव वेगळे ठरतात. कारणते जातिव्यवस्थेला ब्राह्मणांना जबाबदार धरत त्यांच्यावर टीका करत बसले नाहीत. याउलट जातिव्यवस्थेच्या वैज्ञानिक आकलनासाठीच्या 'जातसाक्षरता अभियाना'ला त्यांनी आपल्या आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाचे प्रमुख माध्यम म्हणून कसे स्वीकारले होते याची प्रचिती त्यांच्या वरील विविध उपक्रमातून येते.

## सयाजीरावांचे अस्पृश्योद्धारक कायदे

सयाजीरावांनी विविध अनिष्ट सामाजिक प्रथा, रूढी आणि परंपरा 'एक कायदा करा आणि प्रश्न सोडवा' एवढ्या सवंग पद्धतीने नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही. कारण हजारो वर्षांच्या या परंपरा एखाद्या राज्यकर्त्याच्या एखाद्या कायद्याने नष्ट होऊ शकत नाहीत हे आपण लोकशाहीच्या ७० वर्षांच्या वाटचालीतून अनुभवत आहोत. या पार्श्वभूमीवर लोकांचे मानसिक परिवर्तन आणि सुधारणा कायदे यांचा मेळ घालणारे प्रयत्न यांचा जेव्हा शोध घेऊ लागतो तेव्हा सयाजीराव महाराज वगळता असे दुहेरी प्रयत्न झाल्याचे ठोस उदाहरण सापडत नाही. म्हणूनच सयाजीरावांचे अस्पृश्योद्धारक कायदे या भूमिकेतून समजून घ्यावे लागतील.

१९०८ मध्ये सयाजीरावांनी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन देणारा 'विशेष विवाह कायदा' संपूर्ण बडोदा संस्थानात लागू केला. अशा प्रकारचा कायदा करणारे बडोदा हे तत्कालीन भारतातील पहिले संस्थान होते. या कायद्यानुसार व्यक्तीला आंतरधर्मीय लग्नानंतरही आपल्या इच्छेनुसार धर्माचरणाचे स्वातंत्र्य दिले गेले.

विशिष्ट जातींनाच असणारी पौरोहित्य करण्याची परंपरा मोडीत काढत कोणत्याही जातीतील हिंदूंना पौरोहित्याचा अधिकार देणारा 'पुरोहित कायदा' सयाजीरावांनी ३० डिसेंबर १९१५ रोजी बडोद्यात लागू केला. जगाच्या इतिहासातील हा अशा प्रकारचा पहिला आणि आजअखेरचा एकमेव क्रांतिकारक कायदा आहे. 'जातीय छळ निर्मूलन कायदा' लागू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान आहे. जात-पोटजातीची बंधने, रूढी, प्रथा, परंपरा यांच्यामुळे होणारा लोकांचा छळ थांबवण्यासाठी १९३३ साली हा कायदा करण्यात आला.

शैक्षणिक, आर्थिक साहाय्य व सहकार चळवळीद्वारे अस्पृश्य जातींना इतर समाजघटकांबरोबर समानतेचा दर्जा मिळावा या हेतूने १९३९ मध्ये 'सामाजिक दुर्बलता निर्मूलन कायदा' करण्यात आला. अशा प्रकारचा कायदा लागू करणारे बडोदा हे पहिले संस्थान ठरते. या कायद्यानुसार सार्वजनिक विहिरी, रस्ते वाहतूक इत्यादी वापरण्याबाबत अस्पृश्यांच्या अधिकारांवर निर्बंध घालणाऱ्यांना शिक्षेची तरतूद करण्यात आली. सयाजीरावांनी

केलेले प्रमुख कायदे विचारात घेता १८ कायदे असे होते की जे ५६५ संस्थाने आणि ब्रिटिश भारतातील पहिले कायदे होते. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी सयाजीरावांनी केलेले हे कायदे महाराजांच्या सखोल चिंतनाचे आणि 'क्रांतीदृष्टी'चे पुरावे देतात.

## अस्पृश्यांना संस्कृत शिक्षण

ब्राह्मण सोडून इतर सर्व जातींना ज्या देशात हजारो वर्षापासून संस्कृत शिकण्यास बंदी होती त्या देशात अस्पृश्यांना मोफत संस्कृत शिक्षण देण्याची क्रांती करणारे सयाजीराव हे एकमेव राज्यकर्ते ठरतात.हिंदू धर्मातील सर्व जातींना संस्कृत शिक्षण देण्यामागे सयाजीरावांनी व्यापक उद्दिष्ट ठेवले होते. लोक जे विधी आणि धार्मिक कर्मकांडे करतात ती किमान त्यांनी समजून घेऊन करावीत हा जसा त्यामागे विचार होता तसाच एका जातीच्या कमरेला धर्मसंस्थेच्या चाव्या राहिल्यामुळे होणारे सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक शोषण थांबवणे हाही उद्देश होता.

गुजरातमधील अंत्यज आपापली धार्मिक गृहकृत्ये आपल्या जातीतल्याच पुरोहिताकडून करून घेतात. या पुरोहितांना गरोडा म्हणतात. अस्पृश्य जातींच्या या पुजाऱ्यांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी ऑगस्ट १९१३ मध्ये गरोडा पाठशाळेची सुरुवात करण्यात आली. सयाजीरावांनी वेदाभ्यास हा सर्व जातींचा अधिकार आहे ही भूमिका घेऊन ७ मार्च १९१५ रोजी अस्पृश्य व ब्राम्हणेतरांसाठी पहिली संस्कृत वेदशाळा सुरू केली. १९१५

मध्ये महाराजांनी केलेल्या पुरोहित कायद्याद्वारे हिंदू धर्मातील सर्व जातींना पुरोहित परीक्षा पास होऊन ब्राम्हणांबरोबर पौराहित्य करण्याचा अधिकार महाराजांनी दिला. भारताच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याच्या इतिहासातील हा सर्वात क्रांतिकारक टप्पा होता.

## ब्राम्हणेतरांना संधी

१८७८ पासून मराठी ग्रंथकारांचे संमेलन भरवण्यास सुरुवात झाली. १९०९ पर्यंत या संमेलनांस मराठी ग्रंथकारांचे संमेलन असे नाव होते. १९०९ मध्ये बडोद्यात झालेल्या संमेलनावेळी हे नाव बदलून मराठी साहित्य संमेलन असे व्यापक नामाभिधान देण्यात आले. १९०९ चे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बडोद्यात झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले मुंबईचे के.आर.कीर्तिकर हे पहिले ब्राम्हणेतर अध्यक्ष होते. ही किमया सयाजीरावांमुळेच घडून आली.

१८९७ मध्ये महाराजांनी मॅक्स मुल्लरने भाषांतरित केलेल्या 'सेक्रेड बुक्स ऑफ दी ईस्ट' या मालेत प्रकाशित झालेल्या बारा उपनिषदांचा मराठी अनुवाद करण्याचे काम केळूसकरांवर सोपवले. परंतु बडोद्यातील ब्राह्मण विद्वानांना हे आवडले नाही. त्यामुळे शंकर मोरो रानडे यांनी महाराजांना भेटून "मी सध्या रिकामा आहे. हे उपनिषदाचे काम मला सांगावे" असा

आग्रह केल्यामुळे महाराजांनी उपनिषदाचे अर्धे काम त्यांना दिले. परिणामी सात उपनिषदांचे भाषांतर केळूसकरांनी केले. हे भाषांतर करत असताना केळूसकरांनी मॅक्स मुल्लरऐवजी मूळ संस्कृत ग्रंथांवरून ते केले.

विशेष म्हणजे या अनुवादात मॅक्स मुल्लरचा कोठेही आधार घेतला नाही. फक्त उपनिषदांवरील शांकरभाष्यासाठी मात्र त्यांनी मॅक्स मुल्लरची मदत घेतली. हे भाषांतरही परीक्षण समितीने उत्कृष्ट ठरवले. संस्कृत ग्रंथांवरून थेट मराठीत असे भाषांतर करणारे केळूसकर हे पहिले ब्राह्मणेतर ठरतात. केळूसकरांचे मोल मांडताना डॉ. सदानंद मोरे म्हणतात, “केळूसकर व शिंदे या दोन गुरुवर्यांचा विसर हे मराठ्यांच्या सांस्कृतिक अवनतीचे एक महत्त्वाचे कारण आहे.”

अस्पृश्योन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्या सयाजीरावांनी कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच सर्व जाती धर्मांच्या व्यक्तींना प्रशासनात सामावून घेण्याचे धोरण ठेवले होते. सयाजीरावांनी बडोदा संस्थानात केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या कामाचा परिणाम महाराजांच्या कारकीर्दीच्या पहिल्या २५ वर्षात दृश्य स्वरूपात दिसू लागला. १९११ मध्ये शिक्षण खात्यात २००, लष्करात १९, म्युनिसिपालिटीत १०, पोलिसांत ७, सर्व्हे खात्यात ३ आणि इतर ३ अशा एकंदर २४२ अस्पृश्य व्यक्ती सरकारी नोकरीत कार्यरत होत्या.

## शिष्यवृत्ती आणि दातृत्व

अस्पृश्य जातींच्या पुजाऱ्यांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी ऑगस्ट १९१३ मध्ये सुरू केलेल्या गरोडा पाठशाळेच्या अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षाचा होता. या पाठशाळेतील पहिल्या वर्षाची विद्यार्थी संख्या १० होती. त्यांना दरमहा प्रत्येकी ८ रु. शिष्यवृत्ती देण्यात आली. १९१७ साली या शाळेला भेट दिल्यानंतर सयाजीरावांनी शाळेसाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे आदेश दिले.

१९१७-१८ मध्ये गरोडा पाठशाळेत पहिल्या वर्षाला १० व दुसऱ्या वर्षात १४ अस्पृश्य विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८ रु. व दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना दरमहा ९ रु. शिष्यवृत्ती दिली जाई. या वर्षी केवळ अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर बडोदा सरकारकडून ६०,११९ रु. खर्च करण्यात आले. याचबरोबर बडोद्यात ७ मार्च १९१५ रोजी चालू झालेल्या संस्कृत पाठशाळेत हिंदू धर्मातील सर्व जातींना प्रवेश दिला जात होता. त्याचप्रमाणे संस्कृत ज्ञानाचा लाभ ज्या जातींना मिळत नव्हता त्या सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ रु. च्या दहा शिष्यवृत्ती दिल्या जात होत्या.

सयाजीराव महाराजांनी धर्मानंद कोसंबींना १९०८ ते १९११ अशी तीन वर्षे बौद्ध धर्माचा महाराष्ट्रात प्रसार आणि ग्रंथलेखन करण्यासाठी दरमहा ५० रु. शिष्यवृत्ती दिली होती. पुढे १९१२ ते १९१८ अशी ६ वर्षे धर्मानंद कोसंबी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक असलेल्या कालखंडात पाली भाषेच्या विद्यार्थ्यांना १५ रुपयांच्या दोन व १० रु. दोन अशा एकूण ३,६०० रु. रकमेच्या शिष्यवृत्ती दिल्या. १९३० मध्ये सयाजीरावांनी हिंदू महासभेच्या डॉ. बाळकृष्ण मुंजे यांना त्यांच्या अस्पृश्य निवारणाच्या कार्याला साहाय्य म्हणून १२,००० रु.ची मदत दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ३ कोटी ४० लाख रु. हून अधिक भरते.

सयाजीरावांनी प्राथमिक शाळेतील १ली ते ६वी पर्यंतच्या मागास जातीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी ५००० रुपयांची तरतूद सरकारी बजेटमध्ये केली. याचबरोबर अंत्यज जातीतील मुलामुलींकरिता १,७२८ रुपये विद्यावेतनासाठी राखून ठेवले. तर मागासलेल्या जातीतील विद्यार्थ्यांच्या हायस्कूल शिक्षणासाठी १६ शिष्यवृत्तीकरिता १२६८ रु. ची तरतूद केली. कलाभवनमध्ये मागास जातीतील लोकांना शिक्षण देण्याकरिता १३६८ रुपये राखून ठेवण्यात आले. १९३६ मध्ये राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सवाच्या प्रसंगी सयाजीरावांनी खाजगी फंडातून अस्पृश्य उद्धारासाठी एक कोटी रु.ची तरतूद केली.

सयाजीरावांनी आपल्या जातसाक्षरता अभियानात तसेच सर्व जातीतील दबलेल्या घटकांना समतेच्या महामार्गावर आणण्यासाठी जसे आपल्या संस्थानात प्रयत्न केले तसेच प्रयत्न संस्थानाबाहेर महाराष्ट्राबरोबर देशातही केले. त्यासाठी त्यांनी अनेक तळमळीच्या समाजधुरिणांना पाठबळ दिले. त्यातील प्रमुख व्यक्ती पुढीलप्रमाणे.

## महाराजा सयाजीराव आणि गंगारामभाऊ म्हस्के

सत्यशोधक समाजाचे सदस्य आणि हितचिंतक असणाऱ्या गंगारामभाऊ म्हस्केंनी आधुनिक महाराष्ट्रात मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सर्वप्रथम आणि सर्वाधिक योगदान दिले. गंगारामभाऊ म्हस्केंनी १८८३ मध्ये मराठा जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी पुण्यात डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या शिष्यवृत्तीमुळे हजारो मराठ्यांची मुले शिकली. मराठ्यांमधील पहिली उच्च शिक्षण घेतलेली पिढी म्हस्केंमुळे तयार झाली. पुढे या मंडळींनी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये शिक्षण संस्था व वसतिगृहे सुरू केली. ज्याप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कामाची पार्श्वभूमी तयार केली त्याचप्रमाणे गंगारामभाऊंनी कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कामासाठी जमीन नांगरून ठेवली.

डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या स्थापनेपासूनच सयाजीरावांनी या संस्थेला वार्षिक २४०० रु. प्रमाणे १८८३ ते १९३९ अशी ५६ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ दिले. ही एकूण मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी होती. सयाजीरावांच्या आर्थिक पाठबळावर स्थापन झालेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या स्कॉलरशिपवर शिकलेल्या भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, १९०१ साली शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा बोर्डिंग या पहिल्या वसतिगृहाचे व्यवस्थापन पाहणारे जिवाजीराव सावंत, कोल्हापूर संस्थानातील पहिले मराठा वकील ज्यांची नेमणूक शाहू महाराजांनी न्यायाधीशपदी केली ते खंडेराव बागल आणि पहिले क्षात्रगुरू सदाशिवराव पाटील बेनाडीकर यांच्यासह ३२ उच्चशिक्षित बहुजनांनी शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानात अतिशय महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या.

## महाराजा सयाजीराव आणि विठ्ठल रामजी शिंदे

संपूर्ण भारतात सर्वप्रथम अस्पृश्योद्धारासाठीचे संस्थात्मक काम उभे करणाऱ्या विठ्ठल रामजी शिंदेंनी १८९६ मध्ये शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळवण्याच्या हेतूने लक्ष्मणराव माने व खासेराव जाधव यांच्या मदतीने सयाजीरावांची भेट घेतली. या भेटीत सयाजीरावांनी त्यांना दरमहा २५ रु. स्कॉलरशिप मंजूर

केली. ही स्कॉलरशिप देताना शिक्षणपूर्तीनंतर विठ्ठल रामजी शिंदेंनी बडोद्यात नोकरी करावी अथवा स्कॉलरशिपची रक्कम परत करावी अशी अट त्यांना घालण्यात आली.

सयाजीरावांनी शिंदेंना पदवी आणि एलएल.बी. शिक्षणासाठी ५ वर्षे एकूण सुमारे १,५०० रु.ची मदत केली. यानंतर सयाजीरावांनी शिंदेंना ऑक्सफर्ड येथील तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी आधीची स्कॉलरशिप देताना घातलेली बडोद्यातील नोकरीविषयीची अट बाजूला ठेवून पुन्हा १५०० रु. प्रवास खर्च दिला. यामध्ये सामाजिक कार्य करण्यासाठी जाणीवपूर्वक मनुष्यबळ तयार करण्याचा महाराजांचा उद्देश होता. संपूर्ण भारतात सर्वप्रथम विठ्ठल रामजी शिंदेंनी अस्पृश्योद्धाराचे संस्थात्मक काम उभे केले.

विशेष म्हणजे बाबासाहेबांच्या अगोदर शिंदेंनी देशपातळीवर सुरू केलेल्या या कार्यामागे सयाजीरावांची प्रेरणा होती. सयाजीरावांनी बडोद्यात अगदी १८८२ पासून सुरू केलेले काम अभ्यासण्याची संधी महर्षी शिंद्यांना १९०३ मध्ये मिळाली. हा अनुभव त्यांना या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून देणारा ठरला. विठ्ठल रामजी शिंदेंनी स्थापन केलेल्या ‘डिप्रेस्ड क्लासेस मिशन’ या संस्थेचीदेखील सयाजीरावांनी सातत्याने खंबीर ‘पाठराखण’ केली. सप्टेंबर १९०९ मध्ये डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे शाखेच्या शाळांच्या बक्षीस समारंभाला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहिलेल्या सयाजीरावांनी या संस्थेला एक हजार रुपयांची देणगी दिली.

तर या वसतिगृहातील रा. भटकर नावाच्या महार विद्यार्थ्याला मॅट्रिक परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर कॉलेजातील पुढील शिक्षणासाठी दरमहा २५ रुपयांची स्कॉलरशिप दिली. १८ ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबई येथील डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वर्धापन समारंभाचे सयाजीराव अध्यक्ष होते. यावेळी महाराजांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनला दोन हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीच्या व्याजातून डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या शाळांतील विद्यार्थ्यांना 'दमाजीराव गायकवाड स्कॉलरशिप फंड' या नावाने शिष्यवृत्ती चालू करण्यात आल्या.

२३-२४ मार्च १९१८ रोजी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई येथे भरवलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. या परिषदेत विठ्ठल रामजी शिंदेंनी भारतातील पहिला अस्पृश्यता निवारण ठराव मांडला. या ठरावावर उपस्थित मान्यवरांपैकी शंभरहून अधिक लोकांनी सह्या केल्या. त्यामध्ये पहिली सही करणारे व्यक्ती सयाजीराव होते.

श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या मराठी ज्ञानकोशासाठी १९२३ मध्ये लिहिलेली 'अस्पृश्यता निवारणाचा भारतीय इतिहास' नोंद हे विठ्ठल रामजी शिंदेंचे अत्यंत महत्त्वाचे लेखन आहे. या नोंदीत भारतातील अस्पृश्योद्धाराच्या कामाचा इतिहास सांगताना शिंदेंनी महात्मा फुले, शशिपाद बंडोपाध्याय यांच्यानंतर तिसरा क्रमांक महाराजा सयाजीराव गायकवाड यांना दिला होता. हा क्रमांक

कालानुक्रमे होता. ही दखल घेत असताना सयाजीरावांच्या कार्याच्या परिणामकारकतेबाबत शिंदे म्हणतात, “कार्याच्या प्रमाणाच्या व सिद्धाच्या दृष्टीने पाहताना वरील दोघांपेक्षा महाराजांचे काम इतके विस्तीर्ण व परिणामकारक झाले आहे की, या तिघांच्या कार्याची तुलना करणेच व्यर्थ आहे.” १९३३ मध्ये विठ्ठल रामजी शिंदेंनी स्वतःचा ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ कृतज्ञतापूर्वक सयाजीरावांना अर्पण केला होता.

## महाराजा सयाजीराव आणि ज्ञानकोशकार केतकर

सयाजीराव महाराजांनी १९०६ ते १९११ या चार वर्षांसाठी श्रीधर व्यंकटेश केतकर यांना जातीवरच्या संशोधनासाठी शिष्यवृत्ती दिली. या शिष्यवृत्तीच्या जोरावर केतकरांनी सादर केलेल्या ‘द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया’ या प्रबंधाला १९११ मध्ये अमेरिकेतील कोर्नेल विद्यापीठाने पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली. जातीवरचे भारतीयाने केलेले हे पहिले संशोधन होते. याच नावाने १९०९ मध्ये प्रकाशित झालेला हा प्रबंध जगभर गाजला. बडोदा संस्थानच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ठरावीक वर्षे बडोद्यात नोकरी करणे बंधनकारक असे. या नियमानुसार अमेरिकेतून परतल्यानंतर केतकरांना सयाजीरावांनी बडोदा कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी देऊ केली होती. परंतु ही नोकरी त्यांनी नाकारली.

केतकरांना महाराजांनी दिलेली शिष्यवृत्ती ही खऱ्या अर्थाने भारताच्या बौद्धिक विश्वाला दिलेली देणगी आहे. याबरोबरच सयाजीरावांनी केतकरांच्या मराठी ज्ञानकोशाच्या २००० रु. किमतीच्या प्रती विकत घेतल्या. तर त्यांच्या गुजराथी ज्ञानकोशाला ५००० रु.चे आर्थिक साहाय्य केले. भारतीय जनतेची साक्षरता वाढवण्यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून कर्तव्यभावनेने सयाजीरावांनी ही मदत केली होती. विशेष म्हणजे शिष्यवृत्ती घेऊनही बडोद्यात नोकरी न करण्याच्या केतकरांच्या निर्णयानंतरसुद्धा पुढे सयाजीरावांनी त्यांनी तयार केलेल्या ज्ञानकोशांना आर्थिक पाठबळ दिले. ही बाब कोणताही पूर्वग्रह न ठेवता समाजोपयोगी कामाच्या मागे उभे राहण्याची महाराजांची विशाल दृष्टी दर्शवते.

## महाराजा सयाजीराव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१९०६ मध्ये कृष्णराव अर्जुन केळूसकरांच्या शिफारशीवरून मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्या भीमरावांना सोबत घेऊन दामोदर यंदे मुंबईत सयाजीरावांना भेटले. आर्थिकदृष्ट्या गरीब असणाऱ्या भीमरावांच्या पुढील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळावी हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. या भेटीत सयाजीरावांनी भीमरावांना पुढील शिक्षणासाठी बडोदा सरकारची शिष्यवृत्ती मंजूर केली. भीमरावांना शिष्यवृत्ती देण्यापाठीमागची आपली भूमिका स्पष्ट करताना या भेटीवेळी सयाजीराव म्हणतात, “शिक्षण संपादन

केल्यानंतर तुम्ही आपल्या जातीच्या व विद्येत मागे पडलेल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी हाती घेतली पाहिजे. आम्ही बडोद्यात हे कार्य सुरू केले आहे. त्या कार्याप्रीत्यर्थ तुम्ही आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे.”

महाराजांच्या आज्ञेनुसार पुढील शिक्षणास तयार झालेल्या भीमरावांना पदवी शिक्षणासाठी १९०८ ते १९१३ अशा ५ वर्षांसाठी दरमहा २५ रुपये शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. पदवी शिक्षणानंतर शिष्यवृत्तीच्या करारानुसार डॉ. आंबेडकर १९१३ मध्ये बडोद्यात नोकरीसाठी गेले. महिना ७५ रुपयावर लष्करी विभागात शिकाऊ उमेदवार म्हणून बाबासाहेबांची नेमणूक झाली.

पुढे भीमरावांना अमेरिकेतील उच्चशिक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय सयाजीरावांनी घेतला. त्याचबरोबर पुढील शिक्षणासाठी १९१६ पर्यंत शिष्यवृत्ती मंजूर केली. कोलंबिया विद्यापीठातून भीमराव एम.ए. झाले. त्यानंतर त्यांनी 'The National Dividend of India: A Historical and Analytical Study' हा प्रबंध सादर करून अर्थशास्त्र विषयातील कोलंबिया विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली. पुढे १९२४ मध्ये हा प्रबंध विस्तृत स्वरूपात लंडनमधून प्रकाशित झाला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ सयाजीराव महाराजांना अर्पण करून त्यांच्याप्रतीची कृतज्ञता

व्यक्त केली. विशेष बाब म्हणजे सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीवर कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना १९१६ मध्ये बाबासाहेबांनी जातीवरचा त्यांचा ‘कास्ट्स इन इंडिया: देयर मेकॅनिझम, जेनिसीस अँड डेव्हलपमेंट’ हा पहिला शोधनिबंध सादर केला होता.

१९०८ ते १९१७ अशी ९ वर्षे सयाजीरावांनी बाबासाहेबांना पदवी आणि अमेरिका-इंग्लंडमधील उच्चशिक्षणासाठी सुमारे २०,००० रु. शिष्यवृत्ती दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम अंदाजे ९० लाख रु. इतकी भरते. बाबासाहेबांचा मौलिक ग्रंथसंग्रह असणाऱ्या बोटीचा अपघात झाला तेव्हा नुकसान भरपाई म्हणून पाचशे रुपये मदत बाबासाहेबांनी न मागता महाराजांनी दिली.

१९१७ मध्ये सयाजीरावांनी भीमरावांची बडोद्याच्या धारा सभेवर अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. ही नेमणूक करत असतानाच ज्या सदस्यांची अस्पृश्य सदस्यांसोबत कायदेमंडळात बसण्याची तयारी आहे त्यांनाच धारा सभेची निवडणूक लढवण्याची परवानगी देणारा नियम केला. खास भीमरावांसाठी सयाजीरावांनी हा नियम केला होता. भीमरावांची अर्थ खात्यात मंत्री म्हणून नेमणूक करण्याची महाराजांची इच्छा होती.

शिष्यवृत्तीच्या करारानुसार बडोद्यात नोकरीसाठी आलेल्या भीमरावांची सयाजीरावांनी सुरुवातीला सरकारी अतिथीगृहात वास्तव्याची व्यवस्था केली. त्यानंतर भीमरावांसाठी स्वतंत्र बंगला बांधण्याचा निर्णय घेऊन महाराजांनी या बंगल्यासाठीच्या खर्चाचे अंदाजपत्रक तात्काळ सादर करण्याचे आदेश दिवाणांना दिले. महाराजांनी बाबासाहेबांची बडोद्यात घेतलेल्या काळजीचा हा आजवर दुर्लक्षित राहिलेला महत्त्वपूर्ण पुरावा आहे. परंतु सहकाऱ्यांचा असहकार आणि दुर्वर्तनामुळे भीमराव बडोद्याची नोकरी सोडून मुंबईला परतले. बडोदा संस्थानच्या नियमानुसार शिष्यवृत्ती प्राप्त व्यक्तीने संस्थानात नोकरी करणे अनिवार्य होते.

शिष्यवृती घेऊनही भीमरावांनी बडोद्यात काम केले नाही म्हणून त्यांच्यावर संस्थानाने केलेला खर्च त्यांनी परत करावा अशी पत्रे बडोदा प्रशासनाकडून बाबासाहेबांना वारंवार पाठवण्यात आली. महाराज नियम आणि शिस्त पाळण्यात फार आग्रही असत याचा अवाजवी फायदा या प्रकरणात प्रशासनाने घेतला असण्याची शक्यता अधिक आहे. परंतु आपलाच नियम मोडून भीमरावांना ३ वेळा शिष्यवृत्ती देणाऱ्या सयाजीराव महाराजांनी अखेर १९३२ मध्ये बाबासाहेबांना शिष्यवृत्ती माफ केली.

१९३६ मध्ये पुण्यातील अहिल्याश्रम भेटीवेळी केलेल्या भाषणात बाबासाहेबांना केलेल्या या मदतीविषयी बोलताना महाराज म्हणतात, “डॉ. आंबेडकर यांना शिक्षणासाठी मदत केली. त्यांना अमेरिकेत उच्च शिक्षण माझ्या खर्चाने दिले ही गोष्ट खरी आहे. शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांना मी बडोद्यात नोकरी दिली. परंतु त्यांना राहावयास घरासंबंधी अडचण आल्यामुळे ते मुंबईला गेले. ते गेले त्यामुळे आमचा रोष न होता आम्हास एक प्रकारे आनंद झाला. कारण त्यांना शिकवण्याचा आमचा मुख्य हेतू त्यांनी शहाणे होऊन आपल्या समाजाच्या उद्धाराचे कार्य करावे हाच होता. ते काम त्यांनी हाती घेतलेले पाहून आमचा हेतू सफल झाला असे आम्हास वाटते.”

१९३१ च्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेबांनी केलेले विद्वत्तापूर्ण भाषण ऐकल्यानंतर खुश होऊन महाराजांनी लंडनच्या हॅन्स क्रिसेंट हॉटेलमध्ये बाबासाहेबांना पार्टी दिली. या पार्टीत बाबासाहेबांनी केलेल्या आवाहनानुसार उपस्थित मान्यवरांनी अस्पृश्योद्धाराच्या कामाला महाराजांच्या १५० पौंडासह एकूण १३३५ पौंडची मदत केली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ४४ लाख रु. इतकी भरते. बाबासाहेबांच्या आयुष्यातील प्रत्येक निर्णायक टप्प्यावर महाराजांनी वेळोवेळी त्यांना आर्थिक साहाय्य केले. महाराजांनी बाबासाहेबांना आयुष्यभर केलेली आर्थिक मदत आजच्या रुपयाच्या मूल्यात ४ कोटी ९४ लाख रुपयांहून अधिक भरते.

फेब्रुवारी १९३९ मध्ये महाराजांच्या मृत्यूनंतर 'जनता' वृत्तपत्रात लिहिलेल्या मृत्युलेखात बाबासाहेब लिहितात, "सयाजीराव महाराजांचे निधन ही माझी वैयक्तिक फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. मला त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे आजची योग्यता मला प्राप्त झाली. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार आहेत. त्यांच्या इतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ते मोठे समाजसुधारक होते व बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तद्विषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत. सयाजीराव महाराजांच्या मृत्यूने हिंदुस्थानातील एक फार मोठा मनुष्य नाहीसा झाला. बडोदे संस्थान फार मोठ्या राज्यकर्त्याला मुकले. महाराष्ट्रातील एक विभूति नाहीशी झाली. सामाजिक सुधारणांचा पुढारी नाहीसा झाला. अस्पृश्यांचा कैवारी गेला." बाबासाहेबांनी सयाजीराव हयात असताना कधीही त्यांच्याबद्दल जाहीर कृतज्ञता व्यक्त केल्याचे पुरावे सापडत नाहीत. परंतु मृत्युलेखाच्या निमित्ताने का असेना बाबासाहेबांनी प्रांजळपणे त्यांच्या वैयक्तिक जीवनातील तसेच अस्पृश्यता निर्मूलनाच्या चळवळीतील सयाजीरावांची निर्णायक भूमिका स्पष्टपणे कबूल केली आहे.

एक महान भूमिपुत्र म्हणून बाबासाहेबांना घडवणाऱ्या महाराजा सयाजीराव गायकवाडांना वगळून आपल्याला पुढे जाता येणार नाही. महाराजांच्या निधनानंतर महाराजांचे नातू आणि बडोद्याचे उत्तराधिकारी प्रतापसिंह महाराजांना बाबासाहेबांनी पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी महाराजांचे चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली ही बाब सयाजीरावांचे आंबेडकरांच्या आयुष्यातील स्थान अधोरेखित करण्यासाठी पुरेशी आहे. १९२७ नंतर आंबेडकरांना 'डॉ. बाबासाहेब' ही ओळख मिळाली. क्रांतिकारक लोकनायक म्हणूनदेखील ओळख निर्माण झाली. यामध्ये बाबासाहेबांना अमेरिकेला पाठवण्याचा सयाजीरावांचा निर्णय सर्वाधिक कारणीभूत होता. म्हणून 'भीमराव ते डॉ. बाबासाहेब' या क्रांतीपर्वाचे सूत्रधार म्हणूनही सयाजीरावांना सलाम करणे कृतज्ञतेचे ठरेल.

## महाराजा सयाजीराव आणि महात्मा गांधी

१९१७ मध्ये गांधींनी गोध्रा येथील पहिल्या गुजराथी राजकीय परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवले. या परिषदेत त्यांनी शारदाबेन मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पहिली गुजराथी सामाजिक परिषद घेण्याची सूचना केली. त्यानुसार राजकीय परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ही सामाजिक परिषद शारदाबेन मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शेवटच्या दिवशी गांधींनी गोध्रा

शहरातील भंगी कॉलनीमध्ये अस्पृश्य परिषदेचे आयोजन केले. गांधींनी आयोजित केलेल्या अस्पृश्य परिषदेच्या यशाला सयाजीरावांच्या या दीर्घकालीन प्रयत्नांची मौलिक पार्श्वभूमी लाभली होती.

गांधींच्या या अस्पृश्योद्धाराच्या कार्याबद्दल सयाजीरावांना आपुलकी होती. १९२३ मध्ये बडोद्यात केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, "आम्ही अस्पृश्य बांधवांना समता आणि बंधुत्व ही मानवी मूल्ये नाकारत आहोत. महात्मा गांधी आणि त्यांच्या विचारांची माणसे या सामाजिक प्रश्नांसाठी फार मोठे काम करत आहेत. जर आम्ही महात्मा गांधींचा सल्ला आणि मार्गदर्शन यांचे अनुकरण केले नाही, तर आपणास फार मोठ्या पश्चात्तापास सामोरे जावे लागेल." ज्या काळात गांधींचे नाव उच्चारणे हा गुन्हा ठरत होता. त्या काळात सयाजीरावांनी जाहीर भाषणात गांधींचे अनुकरण करण्याचा सल्ला जनतेला दिला होता. ही बाब स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना म्हणून विचारात घ्यावी लागते. या भाषणामुळे ब्रिटिश सरकारच्या गोटात खळबळ उडाल्यानंतर गांधींच्या अस्पृश्य उद्धाराच्या कार्याची आपण स्तुती केल्याचा 'खुलासा' महाराजांनी केला.

स्वातंत्र्यपूर्वकालीन अस्पृश्यांच्या राजकीय अधिकारविषयक चर्चेत गांधी-आंबेडकर पुणे कराराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाबाबतच्या वादासंदर्भात २२ सप्टेंबर १९३२ रोजी टाटा सन्स अँड कंपनीच्या ए.डी. नौरोजी यांना लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, "तुमची तार मिळाली. मला वाटते की, तथाकथित उच्च हिंदू त्यांनी वागायला हवे, तसे वागत नाही. त्यांनी अस्पृश्यता पूर्णपणे दूर केली पाहिजे. हिंदुत्वामध्ये दुही टाळायची असेल तर सर्व जातीतील लोकांना समान संधी द्यायला हवी. डॉ. आंबेडकरांची समजूत घालू शकलो नाही, याचा खेद वाटतो. श्री. गांधी यांनी उपोषणाचा आग्रह धरू नये, त्यांच्या त्यागामुळे काहीही साध्य होणार नाही." सयाजीरावांच्या या पत्रातून गांधी-आंबेडकर संघर्षात महाराजांची भूमिका किती सुस्पष्ट होती आणि जातीय विषमता अंताबाबत त्यांची भूमिका किती व्यापक होती हे स्पष्ट होते.

## सयाजीरावांना मिळालेले सन्मान

सप्टेंबर १९०९ च्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे शाखेच्या शाळांच्या बक्षीस समारंभ कार्यक्रमात पुणे शहर व लष्कर येथे राहणाऱ्या निरनिराळ्या अस्पृश्य वर्गातील लोकांनी वर्गणी काढून सयाजीरावांच्या अस्पृश्योद्धार कार्याचा जाहीर गौरव करण्यासाठी मानपत्र अर्पण केले. यावेळी अस्पृश्य जातीय

स्त्रियांनी सयाजीरावांना आरती करून ओवाळले. सयाजीरावांनी परत भेट म्हणून आरतीत पाच पाच सोन्याच्या मोहरा ठेवल्या. सयाजीरावांच्या अस्पृश्यता निवारण कार्याच्या गौरवार्थ १९२१ मध्ये परोपकारी सभा व आर्य समाजाने अस्पृश्यांसाठीच्या कार्यासाठी सयाजीरावांना 'पतितपावन' ही पदवी दिली.

९ फेब्रुवारी १९३३ रोजी बडोदा येथे म्युनिसिपॅलिटीतर्फे देण्यात आलेल्या मानपत्र समारंभात सयाजीरावांनी अस्पृश्यतेची उत्पत्ती आणि तिचे स्वरूप यावर भाषण केले. १९३७ मध्ये लंडनमधून प्रकाशित झालेल्या आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाने सयाजीराव महाराजांच्या हयातीत प्रकाशित केलेल्या चरित्र ग्रंथाचे लेखक स्टेनले राईस यांच्या 'हिंदू कस्टम्स अँड देअर ओरिजीन्स' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत सयाजीरावांनी अस्पृश्यतेला आपल्या 'प्रगतीच्या इतिहासावरील डाग' म्हटले आहे. राईस यांनी हा ग्रंथ महाराजांना अर्पण केला आहे. आपल्या कारकीर्दीत सयाजीरावांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेला हा सन्मान होता.

## सयाजीरावलिखित 'The Depressed Classes' निबंध

भारतात ज्यावेळी राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न राष्ट्रीय चळवळीच्या केंद्रस्थानी होता, त्यावेळी या प्रश्नासोबतच 'अस्पृश्यता निवारण' हा विषय हाताळणारे सयाजीराव महाराज पहिले प्रशासक होते. विसाव्या शतकाच्या आरंभी एकशेदहा वर्षांपूर्वी अस्पृश्यतेसारख्या अतिशय गुंतागुंतीच्या

प्रश्नावर सयाजीरावांनी इंग्रजीत गंभीर लेखन करावे, ही आज अविश्वसनीय वाटणारी गोष्ट आहे. डॉ. आंबेडकरांच्या १९३६ मधील 'Annihilation Of Caste' या जगप्रसिद्ध भाषण-निबंधाची पूर्वतयारी ठरणारा सयाजीरावांचा 'The Depressed Classes' हा ऐतिहासिक इंग्रजी निबंध १९०९ मध्ये 'Indian Review' या मासिकाच्या डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यावेळी बाबासाहेब पदवीच्या दुसऱ्या वर्षात शिकत होते. हा लेख म्हणजे आधुनिक भारतातील अस्पृश्यता निर्मूलनाचा पायाभूत दस्तऐवज आणि समतावादी जातीय ऐक्याचा जाहीरनामाच आहे.

सयाजीरावांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिलेला हा लेख जातीच्या प्रश्नाचे महाराजांचे वैज्ञानिक आकलन स्पष्ट करणारा होता. समाजशास्त्र ही ज्ञानशाखा भारतातील पदवी अभ्यासक्रमात प्रविष्ट होण्याअगोदर नऊ वर्षे एक 'देशी' राजा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असा निबंध लिहितो हेच मुळात अलौकिक काम आहे. या निबंधात 'जातीचा प्रश्न सोडवला नाही तर ती भारतासाठी 'राष्ट्रीय आत्महत्या असेल' असा इशारा देणाऱ्या सयाजीरावांनी 'कृती आणि प्रबोधना'च्या संतुलित समन्वयातून जातसाक्षरतेचा 'महाप्रयोग' आपल्या संस्थानात राबवला.

१९०९ मध्ये वयाच्या ४६ व्या वर्षी लिहिलेल्या या निबंधाला सयाजीरावांच्या तीस वर्षाच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या यशस्वी प्रयत्नांचे अधिष्ठान होते. म्हणूनच हा निबंध आधुनिक भारतातील अस्पृश्यता निर्मूलन चळवळीचा पायाभूत दस्तऐवज आहे. भारतात समाजशास्त्र, आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन, तुलनात्मक अभ्यासपद्धती, जागतिक घडामोडींच्या संदर्भात चर्चा या बाबी विद्वानांच्या मुख्यप्रवाही चर्चेत अपवादात्मक असताना या सर्व शिस्तबद्ध आणि शास्त्रीय चौकटीत या प्रश्नांची चर्चा सयाजीरावांनी या निबंधात केली आहे. अतिशय संतुलित तरीही परखड त्याचप्रमाणे एक राष्ट्र म्हणून अस्पृश्यतेच्या प्रश्नाची चर्चा ही या निबंधाची वैशिष्ट्ये आहेत.

अगदी संस्कृत संदर्भांचा आधार, धर्माची परिवर्तनशीलता, धर्मधारणांतील वैज्ञानिक दृष्टिकोन, पुरोहितशाहीचे अर्थकारण या बाबी निबंधात केंद्रस्थानी आहेत. अतिशय संवेदनशील बाबी हाताळत असतानासुद्धा या निबंधातील चर्चा नकारात्मक न होता सकारात्मक झाली आहे. अगदी वर्णव्यवस्थेचा अंत करणारे गौतम बुद्धसुद्धा अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रयत्नात कसे अपुरे ठरतात याची सयाजीरावांनी केलेली चर्चा पुरातत्वशास्त्र आणि प्राच्यविद्या बाल्यावस्थेत असतानाच्या पार्श्वभूमीवर वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

हा निबंध तीन भागांत विभागलेला आहे. पहिला भाग अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीची चर्चा करतो. दुसरा भाग अस्पृश्यतेची व्याप्ती आणि स्वरूप यावर प्रकाश टाकतो. तर तिसरा भाग या प्रश्नाच्या सोडवणुकीचे उपाय आणि गरज अधोरेखित करतो. या निबंधाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक विषमतेचे वैश्विक संदर्भ यामध्ये आढळतात. फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका यासारख्या विदेशी संदर्भांची रेलचेल यामध्ये आढळते. जगभरातील वंशवाद आणि भारतातील अस्पृश्यता यांची स्थलकालसापेक्ष चर्चा स्वतंत्रपणे आणि देशी संदर्भात कशी घडावी याचा हा निबंध म्हणजे वस्तुपाठ आहे. नव्या पिढीतील संशोधकांना संतुलित आणि सकारात्मक चर्चेचा नमुना हा निबंध पुरवतो ही या निबंधाची समकालीन प्रस्तुतता आहे. भारतीय धर्मशास्त्राची चर्चा संस्कृत ग्रंथ ते मध्ययुगीन संत त्याचप्रमाणे आधुनिक काळातील अस्पृश्योद्धाराचे कार्य करणाऱ्या विविध सुधारणा चळवळी यांचा आढावा नेमकेपणाने घेतला आहे. अगदी लोकसंख्येची आकडेवारीसुद्धा आधार म्हणून वापरली आहे.

आधुनिक भारतात एक राजकीय व्यवस्था म्हणून राज्याच्या मुख्य कार्यक्रमपत्रिकेवरील ‘मूलभूत कार्यक्रम’ हा दर्जा ‘अस्पृश्यता निर्मूलन’ या प्रश्नाला देणारा पहिला राजा म्हणून सयाजीरावांच्या कामाची दखल घ्यावी लागेल. महात्मा फुल्यांनी

अस्पृश्यतेच्या प्रश्नाची धारधार चिकित्सा करून विचार आणि कृती अशा दोन्ही स्तरांवर पायाभूत काम केले. जात हा भारतीय समाजाचा पाया असल्याने फुल्यांनी केलेल्या या पायाभूत कामामुळेच त्यांना आपण भारतीय समाजक्रांतीचे जनक मानतो. या क्षेत्रातील सयाजीरावांचे मूलभूत आणि प्रेरणादायी काम आजवर दुर्लक्षित राहिले. या कामामागे सयाजीरावांनी संपूर्ण राजसत्ता उभी केली होती. म्हणूनच फुल्यांनी आपल्या बैठकीच्या खोलीत सयाजीरावांचा फोटो लावला होता.

कारण ज्या धर्मसत्तेने छत्रपती शिवाजींसारख्या युगकर्त्या राजावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला त्याच धर्मसत्तेच्या जोखडातील एक राजा अत्यंत शांतपणे, कल्पकतेने कधी धर्मसत्तेला गोंजारून तर कधी तात्त्विक आव्हान देऊन आपले ध्येय साध्य करतो ही अतिशय असामान्य बाब आहे. म्हणूनच सयाजीरावांच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या योगदानाला ऐतिहासिक महत्त्व आहे. जातीचा प्रश्न राजकारणापलीकडे जाऊन सकारात्मक पद्धतीने हाताळण्यात आपल्याला आलेले अपयश हेच जागतिक महासत्ता होण्यामध्ये आपल्याला आलेला सर्वात मोठा अडथळा आहे. म्हणूनच शासन आणि राज्यकारभाराचा 'सयाजीमार्ग' निवडणे हाच आजच्या काळात आपल्यापुढील सर्वोत्तम पर्याय ठरतो.

जातीअंतक क्रांतीचे प्रणेते महात्मा फुले यांनी मांडलेल्या राष्ट्रवादातील 'एकमय लोक' ही संकल्पना जातविरहित राष्ट्राची मागणी करते. अस्पृश्यता निर्मूलनाशिवाय भारत म्हणजे 'राष्ट्रीय आत्महत्या' आहे हा सयाजीरावांनी १९०९ मध्ये दिलेला इशारा म्हणजे अस्पृश्यता प्रश्नाबाबत त्यांनी मांडलेला समाजशास्त्रीय सिद्धांतच आहे. महात्मा फुल्यांपासून भारतीय समाजाला हजारो तुकड्यांमध्ये विभागणाऱ्या जातिव्यवस्थेची गंभीर चिकित्सा सुरू झाली. परंतु जातिव्यवस्थेचा उगम आणि विकास यांच्या शास्त्रीय अभ्यासाला संस्थात्मक पाठबळ देणारा आधुनिक भारतातील पहिला प्रशासक सयाजीराव होते. हा इतिहास गेल्या ७० वर्षात जातीच्या समाजशास्त्रीय अभ्यास करणाऱ्या एकाही अभ्यासकाच्या चर्चेत ओझरतासुद्धा आलेला नाही.

म्हणूनच त्यांचे समकालीन असणारे महात्मा गांधी यांनी ८ मार्च १९३३ रोजी येरवडा सेंट्रल जेलमधून सयाजीरावांना पाठवलेल्या पत्रात लिहिले होते की, "महाराज आपण बडोदा संस्थानात हरिजनांसाठी शिक्षणाची दार उघडली आणि अस्पृश्यतेचा कलंक कायद्याने पुसून या कामाची कायद्याने अंमलबजावणी केली. आपल्या या लोकोत्तर कामासाठीच आपण सर्वांहून अधिक अभिनंदनास पात्र आहात, हे कबूल करताना माझ्या मनात तिळमात्र शंका नाही." सयाजीरावांच्या कार्याचा विचार केला असता गांधींनी केलेले हे विधान अधिक बोलके आणि समर्पक वाटते.

१८७५ ला सयाजीरावांचा त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षी बडोदा गादीचे वारसदार म्हणून दत्तकविधी झाला. त्यानंतर २ वर्षांनी म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षापासून ते १९३९ मध्ये निधन होईपर्यंत वयाच्या ७६ व्या वर्षापर्यंत सातत्याने ६२ वर्षे हा राजा जातिव्यवस्थेशी यशस्वी लढा देत आला. ६२ वर्षे अखंडपणे ही लढाई करत असताना ते कधीही हतबल आणि निराश झाले नाहीत. कारण त्यांनी हा प्रश्न जेवढा मुळापर्यंत जाऊन समजून घेतला होता तेवढे या प्रश्नाचे चिंतन भारतातील इतर कोणत्याही राज्यकर्त्याने केले नव्हते.

भावनिक होऊन त्यांनी या प्रश्नाला हात घातला नाही. तर अत्यंत बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून आणि व्यावहारिक आकलनातून ते हा प्रश्न हाताळत गेले. त्यामुळेच आजही त्यांचे काम या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी आणि जातीअंताचा आग्रह धरणाऱ्या चळवळींसाठी 'पथदर्शक' आहे. परंतु आजअखेर या दोघांनीही सयाजीरावांकडे ढुंकूनही पाहिले नाही. परंतु आज अभ्यासक आणि चळवळीतील कार्यकर्ते यांना या प्रश्नाने आणलेले कमालीचे नैराश्य घालवण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने जगातील सगळ्यात मोठी लोकशाही या आपल्या दर्जाची प्रतिष्ठा राखण्यासाठी सयाजीरावांचे जातविषयक चिंतन हाच एक पर्याय जवळ करावा लागतो.

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com